THE YASH ACADEMY™

# सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा

## पेपर क्रमांक - 2

## SUBJECTWISE QUESTION SET

## 2017

**Address :**

**3rd Floor, Moonlight Building, Opp.**

**Sitabuldi Police Station, Sitabuldi Nagpur**

**Mob. 7447777799 / 8381077258 / 07122956053**

# सहायक कक्ष अधिकारी , गट - ब (अराजपत्रित) मुख्य परीक्षा

## अभ्यासक्रम -SYLLABUS

**पेपर क्रमांक - 1 मराठी, इंग्रजी व सामान्य ज्ञान या विषयामध्ये खालील घटक / उपघटकांचा समावेश असेल.**

**मराठी :-** सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाकप्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे.

**इंग्रजी :-** Common Vocabulary, Sentence structure, Grammer, use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage.

**सामान्य ज्ञान:-**

1. **चालू घडामोडी - जागतिक तसेच भारतातील**

2. **माहिती अधिकार अधिनियम - 2005, व महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015**

3. **संगणक व माहिती तंत्रज्ञान -** आधुनिक समाजातील संगणकाची भूमिका, वेगवेगळ्या क्षेत्रातील जीवनात संगणकाचा वापर, डाटा कम्युनिकेशन, नेटवर्कींग आणि वेब टेक्नॉलॉजी, सायबर गुन्हे व त्यावरील प्रतिबंध, नवीन उद्योग म्हणून माहिती तंत्रज्ञानाचा निरनिराळ्या सेवा सुविधांची माहिती मिळण्यासाठी होणारा उपयोग, भारतातील माहिती तंत्रज्ञान उद्योगाची वाढ व त्याचा दर्जा, शासनाचे कार्यक्रम, जसे मिडीया लॅब एशिया, विद्या वाहिनी, ज्ञान वाहिनी, सामुहिक माहिती केंद्र इत्यादी. माहिती तंत्रज्ञान उद्योगातील मुलभूत प्रश्न, त्यांचे भवितव्य.

**पेपर क्रमांक - 2**

THE TM
YASH ACADEMY

**सामान्य क्षमता चाचणी व पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक ज्ञान : या विषयामध्ये खालील घटक / उपघटकांचा समावेश असेल.**

1 **बुद्धीमत्ता चाचणी**

2 **महाराष्ट्राचा भूगोल -** महाराष्ट्राचा रचनात्मक (Physical) भूगोल, मुख्य रचनात्मक (Physiographic) विभाग, हवामान (Climate), पर्जन्यमान व तापमान, पर्जन्यातील विभागवार बदल, नद्या, पर्वत, डोंगर, राजकीय विभाग, प्रशासकीय विभाग, नैसर्गिक संपत्ती - वने व खनिजे, मानवी व सामजिक भूगोल - लोकसंख्या (Population), Migration of Population व त्याचे Source आणि Destination वरील परिणाम, ग्रामीण वस्त्या व तांडे, झोपडपट्या व त्यांचे प्रश

3 **महाराष्ट्राचा इतिहास -** सामाजिक व आर्थिक जागृती (1885 - 1947), महत्वाच्या व्यक्तींचे काम, स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे व शिक्षणाचा परिणाम/भाग, स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर समकालीन चळवळी, राष्ट्रीय चळवळी.

4 **भारतीय राज्यघटना -** घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे / ठळक वैशिष्ट्ये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे

-शिक्षण, युनिफॉर्म सिव्हील कोड, स्वतंत्र न्यायपालिका. राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ-Role, अधिकार व कार्य, राज्य विधीमंडळ - विधानसभा, विधानपरीषद व त्याचे सदस्य, ओधकार, कार्य व Role, विधी समीत्या.

5 **राजकीय यंत्रणा (शासनाची रचना अधिकार व कार्ये) केंद्रसरकार केंद्रिय विधिमंडळ आणि राज्यसरकार व प्रशासन (महाराष्ट्राचा विशेष संदर्भ)**

6 **जिल्हा प्रशासन, ग्रामीण आणि नागरी स्थानिक शासन**

7 **न्यायमंडळ** – न्यायमंडळाची रचना, एकात्मीक न्यायमंडळ - कार्ये, सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाची भूमिका व अधिकार,दुय्यम न्यायालये - लोकपाल, लोकायुक्त आणि लोक न्यायालय सांविधानिक आदेशाचे रक्षण करणारे न्यायमंडळ, न्यायालयीन सक्रियता. जनहित याचिका.

8 **नियोजन** – प्रक्रिया, प्रकार, भारताच्या पहिल्या ते दहाव्या पंचवार्षिक योजनेचा आढावा, मुल्यांकन, सामाजिक व आर्थिक विकासाचे निर्देशफलक, राज्य आणि स्थानिक पातळीवरील नियोजन, विकेंद्रीकरण, 73 व 74 वी घटना दुरूस्ती, भारतीय अर्थव्यवस्था, क्षेत्रीय विकासाचा कल व सेवा क्षेत्राची रूपरेषा, भारतीय अर्थव्यवस्थेच्या समोरील आव्हाने, गरीबी,बेरोजगारी अणि प्रादेशिक असमतोल.

**सहायक कक्ष अधिकारी मुख्य परीक्षा (पेपर – 2)**

**PAPER ANALYSIS - SUBJECTWISE**

| विषय | वर्ष (2017) |
|---|---|
| चालू घडामोडी व इतर घटक [CURRENT AFFAIRS] | 10 |
| बुद्धीमत्ता चाचणी [REASONING] | 10 |
| भूगोल [GEOGRAPHY] | 05 |
| इतिहास [HISTORY] | 05 |
| भारतीय राज्यघटना [INDIAN POLITY] | 10 |
| माहिती अधिकार अधिनियम - 2005 [RTI ACT -2005] | 05 |
| संगणक व माहिती तंत्रज्ञान [COMPUTER & IT] | 10 |
| राजकीय यंत्रणा [POLITICAL SYSTEM] | 22 |
| जिल्हा प्रशासन, ग्रामीण आणि नागरी स्थानिक शासन | 18 |
| न्यायमंडळ [JUDICIARY] | 05 |
| नियोजन [PLANNING] | --- |
| | 100 |

# सहायक (मुख्य) परीक्षा - २०१७

| | | |
|---|---|---|
| परीक्षा दिनांक : 11/12/2017<br>वेळ : 1 तास | सामान्य अध्ययन - पेपर २ | एकुण प्रश्न : 100<br>एकुण गुण : 100 |

## चालू घडामोडी व इतर घटक

1. 'प्रधानमंत्री उज्वला योजनेबाबत' खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे ?
   1) दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना एल.पी.जी. जोडणी देणारी ही एक सामाजिक कल्याणकारी योजना आहे.
   2) केन्द्र शासनाने 2017-18 या वर्षासाठी 5 कोटी एल.पी.जी. जोडणी देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.
   3) महिलांना स्वच्छ स्वयंपाक इंधन उपलब्ध करून त्यांच्या आरोग्याचे संरक्षण करणे हा या योजनेचा उद्देश आहे.
   4) सदरहू योजना 2016 साली लागू करण्यात आली.

---

2. 'स्कीम फॉर ॲग्रोमरीन प्रोसेसिंग अँड डेव्हलपमेंट ऑफ ॲग्रो प्रोसेसिंग क्लस्टर्स' या योजनेचे नाव बदलून कोणते नाव ठरविण्यात आले आहे ?
   1) प्रधानमंत्री पीक विमा योजना 2) परंपरागत कृषी विकास योजना
   3) राष्ट्रीय कृषी विकास योजना 4) प्रधानमंत्री किसान संपदा योजना

---

3. जोडया लावा (अरूण साधु यांचे साहित्यिक कार्य)

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| अ. कादंबरी | 1. संज्ञापना क्रांती |
| ब. कथासंग्रह | 2. सिंहासन |
| क. नाटक | 3. मंत्रजागर |
| ड. शैक्षणिक | 4. पडघम |

पर्याय :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | II | I | IV | III |
| 2) | III | I | II | IV |
| 3) | IV | III | II | I |
| 4) | II | III | IV | I |

---

4. अल्पसंख्याकांचे सक्षमीकरण उद्देश असलेल्या कोणत्या योजनेचा प्रारंभ जानेवारी, 2016 मध्ये जम्मू व काश्मिर येथे झाला ?
   1) नई तलाश 2) नया मसिहा 3) नई मंजिल 4) नई प्रगती, नया विश्वास

---

5. किदांबी श्रीकांत बाबत खालील विधाने विचारात घ्या :
   अ. तो ऑस्ट्रेलियन ओपन जिंकणारा पहिला भारतीय पुरूष बॅडमिंटन खेळाडू आहे.
   ब. तो इंडोनेशिया ओपन जिंकणारा पहिला भारतीय पुरूष बॅडमिंटन खेळाडू आहे.
   क. तो चीन ओपन जिंकणारा पहिला भारतीय पुरूष बॅडमिंटन खेळाडू आहे.
   ड. तो स्वीस ग्रँड प्रिक्स गोल्ड जिंकणारा पहिला भारतीय पुरूष बॅडमिंटन खेळाडू आहे.
   वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?
   1) अ, ब, क 2) ब,क, ड 3) अ, क, ड 4) अ, ब, क , ड

---

THE YASH ACADEMY

6. राष्ट्रपती निवडणूक-2017 बाबत खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे ?
1) विधानसभा सदस्यांच्या मताचे मूल्य हे त्याच्या/तिच्या राज्याच्या लोकसंख्येवर अवलंबून असते.
2) संसद सदस्यांच्या मताचे मूल्य हे सर्वांच्या सारखेच असते.
3) उत्तर प्रदेश विधानसभा सदस्यांच्या प्रत्येक मताचे मूल्य सर्वाधिक होते.
4) गोवा विधानसभा सदस्याच्या प्रत्येक मताचे मूल्य सर्वात कमी होते.

---

7. भारतातील एका पर्यटन स्थळासाठी शून्य-उत्सर्जन (प्रदुषन) अशी इलेक्ट्रिक बस सेवा सुरू करण्यात आली आहे. हे पर्यटन स्थळ ------- या राज्यात आहे.
1) उत्तराखंड 2) मेघालय 3) हिमाचल प्रदेश 4) राजस्थान

---

8. भारतीय क्रीडा मंत्रालयाने प्रथमच राष्ट्रीय क्रीडा संग्रहालय स्थापन करण्याचे योजिले आहे. हे संग्रहालय ------ शहरात असेल.
1) मुंबई 2) नवी दिल्ली 3) कोलकाता 4) बेंगलूरू

---

9. साहित्यात मिळालेला 2017 नोबेल पुरस्काराच्या संदर्भात पुढील विधानांवर विचार करा.
अ. विजेत्याचे नाव काझुओ इशिगुरो आहे. ब. तो एक ब्रिटिश लेखक आहे. क. त्यांचा जन्म जपानमध्ये झाला.
वरीलपैकी कोणती विधान/ने बरोबर आहेत ?
1) फक्त अ बरोबर 2) फक्त ब बरोबर 3) फक्त क बरोबर 4) वरील सर्व विधाने बरोबर आहेत

---

10. ब्रिक्स-ए.आर.पी.ची स्थापना करण्यासाठी भारत आणि विविध ब्रिक्स देशांमधील एका सामंजस्य करारास (एम ओ यू) केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या कराराची------- उद्दिष्टे आहेत.
1) निरंतर आरोग्य विकास 2) निरंतर शेती विकास 3) निरंतर औषध विकास 4) निरंतर पर्यावरण विकास

---

## बुद्धीमत्ता चाचणी

11. सुरेश 3 कि.मी. उत्तरेस गेला, नंतर उजवीकडे वळून 6 कि.मी. गेला. पुन्हा उजवीकडे वळून 3 कि.मी. गेला नंतर पुन्हा डावीकडे वळून 6 कि.मी. गेला तर तो मूळ जागेपासून किती दूर आहे आणि कोणत्या दिशेस आहे ?
1) 9 कि.मी दक्षिण 2) 6 कि.मी. पश्चिम 3) 12 कि.मी. पुर्व 4) 6 कि.मी. उत्तर

THE YASH ACADEMY

---

12. अंकिता ही संगितापेक्षा मोठी आहे. गिरीश हा संगितापेक्षा मोठा पण अंकितापेक्षा लहान आहे. शिरिष हा श्याम आणि संगितापेक्षा लहान आहे. संगिता ही श्यामपेक्षा मोठी आहे. त्यांच्यात सर्वात लहान कोण आहे ?
1) गिरिश 2) श्याम 3) शिरिष 4) संगिता

---

13. विधाने : एकही शिक्षणतज्ज्ञ, संशोधक नाही.
सर्व संशोधक शिक्षक आहेत.
अनुमाने : I. एकही शिक्षक, संशोधक नाही
II. एकही शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ नाही
III. काही संशोधक हे शिक्षक आहेत
IV. काही शिक्षक हे संशोधक आहेत
1) फक्त II अनुमान सत्य
2) एकही अनुमान सत्य नाही
3) I किंवा III अनुमान सत्य
4) फक्त III आणि IV अनुमाने सत्य

---

14. खालील आकृतीत गहाळ झालेली संख्या शोधा.




1) 0    2) 8    3) 125    4) 216

15. जर 'MACHINE' या शब्दाचा संकेत 19-7-9-14-15-20-11 असा असेल तर 'DANGER' या शब्दाला संकेत तुम्ही कसा लिहाल ?

1) 11-7-20-16-11-24    2) 13-7-20-9-11-25    3) 10-7-20-13-11-24    4) 13-7-20-10-11-25

16. रसिला बहुत करून तिच्या भावाला त्यांच्या स्थानिक रेल्वे स्थानकात संध्याकाळी 5.56 वाजता भेटते आणि तो तिला त्यांच्या घरी घेऊन येतो. एके दिवशी तिने तिची कचेरी लवकर सोडली आणि ती स्थानकावर संध्याकाळी 4.50 वाजता पोहोचली. ती तिच्या घराच्या दिशेने चालू लागली. वाटेत तिला त्यांच्या घरून येणारा भाऊ भेटला आणि ते घरी नेहमीपेक्षा 20 मिनिटे आधी पोहोचले. तर ती किती वेळ चालली?

1) 1 तास 4 मिनिटे    2) 46 मिनिटे

3) 56 मिनिटे    4) घरी पोहोचण्यासाठी लागणारा वेळ दिलेला नसल्यामुळे गणन करता येणार नाही

17. पाण्याच्या कमतरतेच्या समस्येबाबत चर्चा करण्यासाठी एक गट जमला आहे. यातील 7 व्यक्ती कन्नड बोलतात, 15 तामीळ बोलतात आणि 8 मराठी बोलतात. यातील सर्वांना इंग्रजी समजते पण कोणीही ती बोलू शकत नाहीत. यापैकी प्रत्येक येथे उल्लेख केलेल्यापैकी एक वा अधिक प्रादेशिक भाषा बोलू शकतात. जर या गटातील 3 व्यक्ती दोन भाषा बोलत असतील आणि फक्त दोन व्यक्ती सर्व भाषा बोलू शकत असतील तर गटातील व्यक्तींची संख्या किती ?

1) 22    2) 23    3) 24    4) 25

18. राहुलची आई ही मोनिकाच्या वडिलांची एकुलती एक मुलगी आहे तर मोनिकाच्या पतीचे राहुलशी नाते काय ?

1) काका    2) वडील    3) आजोबा    4) भाऊ

THE YASH ACADEMY TM

19. पुढे दिलेले प्रतिपादन आणि कारण अभ्यासा :

प्रतिपादन अः गेल्या काही दशकात मोठया प्रमाणात जागतिक तापमान वृध्दी होत आहे.

कारण ब : आर्थिक विकासावर दिलेल्या जोरामुळे वातावरणात उत्सर्जित केल्या जाणाऱ्या हरितगृह वायूंचे प्रमाण धोकादायक प्रमाणात वाढले आहे.

प्रतिपादन आणि कारण यांचे वर्णन करणारा सर्वात उचित पर्याय निवडा.

1) अ आणि ब दोन्ही सत्य असून ब हे अ चे योग्य स्पष्टीकरण आहे.

2) अ आणि ब दोन्ही सत्य असले तरीही ब हे अ चे योग्य स्पष्टीकरण नाही

3) अ सत्य आहे परंतु ब हे सत्य नाही

4) अ असत्य आहे परंतु ब हे सत्य आहे

20. A, B व C या चढत्या क्रमाने येणाऱ्या तीन विषम संख्या आहेत. जर A ची तिप्पट ही C च्या दुपटीपेक्षा तीनने लहान असेल तर C ची किमंत असलेला पर्याय निवडा.

1) 11    2) 9    3) 7    4) 5

## महाराष्ट्राचा भूगोल

21. जोडया लावा.

| जिल्हा | तालुका |
|---|---|
| अ.चंद्रपूर | 1. चार्मोशी |
| ब. गडचिरोली | 2. गोंड पिंपरी |
| क. भंडारा | 3. मोहाडी |
| ड. वर्धा | 4. देवळी |

पर्याय :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | IV | III | II | I |
| 2) | III | II | I | IV |
| 3) | I | II | IV | III |
| 4) | II | I | III | IV |

22. महाराष्ट्र राज्याचा विस्तार ------ पूर्व रेखावृत्त ते ------ पूर्व रेखावृत्तादरम्यान आहे.
1) $76^0$ 46’; $80^0$ 52’  2) $72^0$ 36’; $80^0$ 54’  3) $71^0$ 36’; $80^0$ 55’  4) $72^0$ 46’; $80^0$ 54’

23. जोडया लावा.

| ठिकाण | अभयारण्य |
|---|---|
| अ. चंद्रपूर | 1. बोर |
| ब. नागपूर | 2. नवेगाव |
| क. भंडारा | 3. ताडोबा |
| ड. वर्धा | 4. पेंच |

पर्याय :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 4 | 3 | 2 | 1 |
| 2) | 1 | 4 | 3 | 2 |
| 3) | 2 | 1 | 4 | 3 |
| 4) | 3 | 4 | 2 | 1 |

THE YASH ACADEMY TM

24. तापी नदी कोणत्या जिल्हयातून गुजरात राज्यात प्रवेश करते ?
1) जळगाव  2) नाशिक  3) नंदूरबार  4) धुळे

25. सातपुडा दोन भागात ------ मुळे विभागला जातो.
1) अंजिठा फट  2) नर्मदा फट  3) बऱ्हानपुर फट  4) सातमाळा फट

## महाराष्ट्राचा इतिहास

26. 19 व्या शतकात प्रकाशित झालेली पुस्तके व त्यांचे लेखक/संपादक यांच्या जोडया जुळवा.

| | |
|---|---|
| अ. भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश | 1. शंकर पांडूरंग पंडित |
| ब. वेदार्थ यत्न | 2. जे. एम्. गुर्जर |
| क. षड्दर्शन चिंतनिका | 3. रघुनाथ भास्कर गोडबोले |
| ड. मनुस्मृतीचे मराठीत भाषांतर | 4. डॉ. महादेव मोरेश्वर कुंटे |

पर्याय :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 1 | 2 | 3 | 4 |
| 2) | 3 | 1 | 4 | 2 |
| 3) | 1 | 3 | 2 | 4 |
| 4) | 4 | 1 | 2 | 3 |

27. पुढील वृत्तपत्रे व ती जेथून प्रकाशित होतात ती स्थळे यांच्या जोडया जुळवा.

| | |
|---|---|
| अ. महाराष्ट्र | 1. अमरावती |
| ब. लोकमत | 2. यवतमाळ |
| क. मातृभूमि | 3. अकोला |
| ड. स्वतंत्र हिंदूस्थान | 4. नागपुर |

पर्याय :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 1 | 2 | 3 | 4 |
| 2) | 2 | 1 | 4 | 3 |
| 3) | 4 | 2 | 3 | 1 |
| 4) | 3 | 4 | 2 | 1 |

28. ------- यांच्या प्रोत्साहनाने कृष्णाजी अर्जुन केळुसकरांनी मराठीत 'शिवचरित्र' लिहिले.
1) सयाजीराव गायकवाड    2) यशवंतराव भोसले    3) शाहू महाराज    4) ताराबाई

29. बडोदा वत्सल, राघव भूषण आणि अंबा लहरी ही ------- चालवलेली वृत्तपत्रे होती.
1) लोकहितवादींनी    2) आर्य समाजांनी    3) सत्यशोधकांनी    4) विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी

30. पुढीलपैकी विजोड व्यक्ती ओळखा.
1) मल्लपा धन शेट्टी    2) जगन्नाथ शिंदे    3) अब्दूल रसूल    4) सिध्दाप्पा कांबळी

## भारतीय राज्यघटना

31. -------- अनुच्छेदातील तरतूदीनुसार राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करता येते.
अ. अनुच्छेद 356    ब. अनुच्छेद 352    क. अनुच्छेद 360    ड. अनुच्छेद 365
1) फक्त अ    2) अ, ब    3) अ, ड    4) अ, क

32. भारताच्या खालीलपैकी कोणत्या राज्यांमध्ये विधान परिषद अस्तित्वात आहे ?
अ. बिहार    ब. कर्नाटक    क. तेलंगणा    ड. मध्यप्रदेश
1) फक्त अ, ब, क    2) फक्त अ, ब, ड    3) फक्त ब, क, ड    4) फक्त अ, क, ड

33. योग्य कथन/कथने ओळखा.
अ. सिक्कीमच्या विधानसभेत 32 सदस्य आहेत.
ब. विधानसभेत कमीत कमी सदस्य संख्या 60 असते.
1) फक्त अ    2) फक्त ब    3) अ आणि ब दोन्ही    4) अ आणि ब दोन्हीही नाही

34. योग्य कथन/कथने ओळखा.

अ. राज्याच्या महाधिवक्त्याची नियुक्ती राज्यपाल करतात.

ब. राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षाची नेमणूक राज्यपाल करतात.

क. उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांची नियुक्ती राज्यपाल करतात.

1) फक्त अ 2) फक्त अ, ब 3) फक्त अ, क 4) वरील सर्व

---

35. अनुच्छेद 12 नुसार 'राज्य' मध्ये याचा समावेश होतो.

अ. भारताचे शासन व संसद ब. प्रत्येक राज्याचे शासन व विधिमंडळ

क. सर्व स्थानिक संस्था ड. भारतीय शासनाच्या नियंत्रणाखालील संस्था

1) फक्त अ, ब, ड 2) फक्त अ, ब, क 3) फक्त अ, ब 4) वरील सर्व

---

36. भारतीय राज्यघटनेतील कोणत्या तरतूदी न्यायालयाच्या स्वतंत्रतेशी संबंधित आहे ?

अ. न्यायाधिशांची नियुक्ती व पदच्युती ब. कार्यकाळाची सुरक्षा

क. वेतन व सेवा शर्ती ड. न्यायालयास अवमानाबाबत शिक्षा देण्याचा अधिकार

1) फक्त अ, ब, क 2) फक्त अ, ब, ड 3) ब, क, ड 4) वरील सर्व

---

37. आंतरराष्ट्रीय संबंधातील वर्तनाबाबत खालीलपैकी कोणत्या मार्गदर्शक तत्वाचा समावेश राज्यघटनेत झालेला नाही ?

1) राष्ट्रांराष्ट्रांमध्ये न्यायसंगत व सन्मानपूर्वक संबंध राखण्यासाठी कार्य करणे.

2) आंतरराष्ट्रीय कायदा आणि तह यातील कर्तव्यांचा मान राखणे.

3) आंतरराष्ट्रीय तंटे लवादामार्फत मिटविण्यास प्रोत्साहन देणे.

4) निःशस्त्रीकरणासाठी कार्य करणे.

---

38. भारतीय राज्यघटनेने खालीलपैकी कोणता मूलभूत अधिकार हा केवळ भारतीय नागरिकांनाच दिलेला आहे ?

THE YASH ACADEMY

1) कायद्यापुढे समानतेचा हक्क (अनुच्छेद 14) 2) स्वातंत्र्याचा हक्क (अनुच्छेद 19)

3) प्राथमिक शिक्षणाचा हक्क (अनुच्छेद 21 अ) 4) जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्याचे संरक्षण (अनुच्छेद 21)

---

39. भारतीय राज्यघटनेची खालील वैशिष्टये आणि त्यांचे स्त्रोत यांच्या जोडया लावा:

| वैशिष्टय | राज्यघटना |
|---|---|
| अ. न्यायालयीन पुनर्विलोकन | 1. इंग्लंड |
| ब. कायद्याचे अधिराज्य | 2. अमेरिका |
| क. शेषाधिकार केन्द्राकडे | 3. ऑस्ट्रेलिया |
| ड. समवर्ती सूची | 4. कॅनडा |

पर्याय :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 2 | 1 | 4 | 3 |
| 2) | 1 | 2 | 3 | 4 |
| 3) | 1 | 2 | 4 | 3 |
| 4) | 2 | 1 | 3 | 4 |

40. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याबाबत खालील विधाने विचारात घ्या.
अ. सरनामा हा राज्यघटनेचे अविभाज्य अंग आहे.
ब. सरनाम्यातील तरतूदी या न्यायालयाद्वारे अंमलात आणता येतात.
क. सरनामा हा विधिमंडळाच्या अधिकाराचे स्त्रोत म्हणून कार्य करू शकतो.
वरीलपैकी कोणते विधान/ने बरोबर आहे/त ?
1) फक्त अ 2) फक्त क 3) फक्त ब, क 4) अ, ब, क

---

## माहिती अधिकार अधिनियम - 2005

41. माहितीचा अधिकार अधिनियम या उद्देशाने पारीत केला आहे ?
1) सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये पारदर्शकता आणणे
2) सार्वजनिक प्राधिकरणांच्या कामात जबाबदारी आणणे
3) माहिती आयुक्तालयांची स्थापना करणे
4) वरील सर्व

---

42. माहिती अधिकार कायदा, 2005 अन्वये 'विहीत' याचा अर्थ या कायद्याअंतर्गत ----- यांनी तयार केलेले नियम.
अ. समुचित शासन ब. सक्षम प्राधिकारी क. उच्च न्यायालये ड. प्रशासकीय लवाद
वरील कोणते विधान/विधाने बरोबर आहेत ?
1) फक्त अ 2) अ आणि ब 3) अ, ब आणि क 4) फक्त ड

---

43. माहिती अधिकार कायदा, 2005 च्या कोणत्या तरतूदीनुसार नागरिकांना 'माहितीचा अधिकार' प्राप्त झाला आहे ?
1) कलम 2 2) कलम 3 3) कलम 4 4) कलम 5

---

44. खालीलपैकी केव्हा मुख्य माहिती आयुक्तास किंवा माहिती आयुक्तांना त्यांच्या पदावरून दूर करण्यात येईल ?
अ. पंतप्रधान यांनी राष्ट्रपती यांचेकडे शिफारस केल्यावरून
ब. राष्ट्रपतींच्या आदेशावरून सर्वोच्च न्यायालयाने निर्देश केल्यानंतर
क. शाबीत झालेल्या गैरवर्तनाच्या किंवा असमर्थतेच्या कारणास्तव
ड. उच्च न्यायालयाने पदावरून दूर केले पाहिजे, असा अभिप्राय दिल्यानंतर राष्ट्रपतीच्या आदेशाद्वारे
वरीलपैकी कोणते विधान/विधाने बरोबर आहेत ?
1) फक्त अ 2) वरील सर्व 3) क आणि ड 4) ब आणि क

---

45. माहितीचा अधिकार हा -------- आहे.
1) संविदात्मक अधिकार 2) घटनात्मक अधिकार 3) वैधानिक अधिकार 4) वरीलपैकी काहीही नाही

---

## संगणक व माहिती तंत्रज्ञान

46. ------- म्हणजे ज्या सिस्टिममध्ये सिक्युर की ची जोडी असून त्यातील 'प्रायव्हेट की' ही डिजिटल सिग्नेचर तयार करते व 'पब्लिक की' वापरून त्याचा पडताळा करते.
1) असर्टीन क्रिप्टो सिस्टिम 2) ॲक्टिंग क्रिप्टो सिस्टिम 3) असिंक्रोनस क्रिप्टो सिस्टिम 4) असिमेट्रिक क्रिप्टो सिस्टिम

---

47. संगणकात छापील प्रतिमा साठविण्याकरता वापरण्यात येणाऱ्या उपकरणास काय संबोधले जाते ?
1) मॉनिटर 2) प्रिंटर 3) स्कॅनर 4) वरीलपैकी नाही

---

48. भारताच्या ह्यूमन रिसोर्स डेव्हलपमेंट (MHERD) ने डिजिटल लर्निंग क्षेत्रातील डिझाईनमधील आयसीटी वापर करून तयार केलेली

प्रणालीचे नाव --------- आहे.

1) इ-सागू 2) इ-टयुटर 3) इ-कल्पा 4) इ-शिक्षा

49. एम.एच.आर.डी.चे ------- हे प्रोजेक्ट शास्त्रज्ञ, विद्वान, लेक्चरर्स व इतर आर आणि डी संस्था हयांची एकत्रित डेटाबेस इनफ्लीबनेट याद्वारे संकलित करते.

1) संस्कार 2) इ-टॅलंट 3) विद्वान 4) इ-रिसर्च

50. संगणकाच्या परिभाषेनुसार किलोबिट्स या संज्ञेद्वारे किती बिट्स दर्शवले जातात ?

1) एक हजार बिट्स 2) एक हजार चोविस बिट्स 3) एक हजार चाळीस बिट्स 4) वरीलपैकी नाही

51. संगणक परिभाषेनुसार वापरली जाणारी टी.बी (TB) ही संज्ञा नेमके काय स्पष्ट करते ?

1) संणकाचा विषाणू 2) टेरा बिट्स 3) टेरा बाईट्स 4) वरीलपैकी नाही

52. भारताच्या नियंत्रक सर्टिफाईंग ॲथोरिटिने खालीलपैकी कोणाला डिजिटल सर्टिफाईंग ॲथोरिटि म्हणून नेमले आहे ?

1) डी-मुद्रा 2) इ- मुध्रा 3) डी-सर्टीफिकेट 4) डि.सी.ए

53. SRAM, DRAM, EDO-RAM हे संगणक मेमरीचे प्रकार नेमके कशाशी संबंधित आहेत ?

1) रँडम ॲक्सेस मेमरी 2) रीड ओन्ली मेमरी 3) हार्ड डिस्क मेमरी 4) वरीलपैकी नाही

54. संगणकाचा वेग वाढविण्याच्या उद्देशाने सी.पी.यू. व रॅम यांच्या जोडणीत खालीलपैकी काय वापरले जाते ?

1) रॉम (ROM) 2) कॅश (Cache) मेमरी 3) हार्ड डिस्क मेमरी 4) वरीलपैकी नाही

55. खालीलपैकी कोणती बाब संगणकाचा मेंदू समजली जाते ?

1) मदरबोर्ड 2) हार्ड डिस्क 3) सी.पी.यू 4) वरीलपैकी नाही

THE YASH ACADEMY TM

## राजकीय यंत्रणा (शासनाची रचना अधिकार व कार्ये) केंद्रसरकार केंद्रिय विधिमंडळ आणि राज्यसरकार व प्रशासन (महाराष्ट्राचा विशेष संदर्भ)

56. विधान परिषदेची निर्मिती अथवा रद्द करण्याबाबत खालील विधाने विचारात घ्या.

अ. विधान परिषद निर्मिती करणे अथवा रद्द करण्याबाबतचे अधिकार अनुच्छेद 169 अन्वये संसदेला आहे.

ब. जेथे विधान परिषद निर्माण करावयाची आहे अथवा असलेली रद्द करावयाची आहे त्या संबंधित राज्याच्या विधानसभेने तसा ठराव साध्या बहुमताने मंजूर करणे आवश्यक असते.

क. संसदेमध्ये तसा ठराव/अधिनियम हा साध्या बहुमताने मंजूर केला जातो.

वरीलपैकी कोणते विधान/ने बरोबर आहे/त ?

1) फक्त अ 2) अ, ब, क 3) ब, क 4) अ,क

57. खालीलपैकी कोणत्या बाबतीत केवळ निम्म्यापेक्षा कमी नाही इतक्या घटक राज्यांच्या विधिमंडळाच्या मान्यतेने घटनादुरूस्ती करणे शक्य होते?

1) 5 वे परिशिष्ट 2) 6 वे परिशिष्ट 3) 7 वे परिशिष्ट 4) 2 रे परिशिष्ट

58. खालीलपैकी कोणत्या परिस्थितीमध्ये राज्यपाल आपला विवेकाधीन अधिकार वापरू शकत नाही ?

1) जर कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नसेल तेव्हा मुख्यमंत्री नेमताना
2) पदावरील मुख्यमंत्र्याचा अचानक मृत्यू झाल्यास नव्याने मुख्यमंत्री नेमताना
3) विधानसभेत बहुमताचा पाठिंबा गमावलेल्या मुख्यमंत्र्याने विधानसभा बरखास्त करण्याचा सल्ला दिल्यास
4) विधानसभेत स्पष्ट बहुमताचा पाठींबा असलेल्या मुख्यमंत्र्याने विधानसभा बरखास्त करण्याचा सल्ला दिल्यास

---

59. खालील विधाने विचारात घ्या.
अ. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखालील जे.व्ही.पी. समितीने आपला अहवाल 1948 मध्ये सादर केला.
ब. द्विभाषिक बॉम्बे राज्याचे विभाजन राज्य पुनर्रचना अधिनियमाद्वारे झाले.
क. द्विभाषिक बॉम्बे राज्याचे विभाजन बॉम्बे पुनर्रचना अधिनियमाद्वारे झाले.
वरीलपैकी कोणते विधान/ने बरोबर आहे/त ?
1) अ, ब　　2) अ, क　　3) फक्त क　　4) फक्त ब

---

60. भारताचा नियंत्रक व महालेखापरिक्षकाबाबत खालील विधाने विचारात घ्या.
अ. नियंत्रक व महालेखापरीक्षकांचा दर्जा मुख्य निवडणूक आयुक्तांच्या बरोबरीचा आहे. परंतु पदनाम तालिकेनुसार राज्यसभेच्या उपाध्यक्षांपेक्षा वरचा आहे.
ब. भारतीय लेखा व लेखा परीक्षण विभागामधील सेवेतील व्यक्तिंच्या सेवेच्या अटी नियंत्रक व महालेखापरीक्षक हे राष्ट्रपतीबरोबर सल्लामसलत करून निश्चित करतात.
1) विधान अ बरोबर　　2) विधान ब बरोबर　　3) दोन्हीही विधाने बरोबर　　4) दोन्हीही विधाने चूकीची

---

61. सचिवालय विभागाची योग्य पदसोपान परंपरा --------- अशी आहे.
1) सचिव-सहसचिव-अतिरिक्त सचिव-अवर सचिव-उपसचिव- सहाय्यक सचिव
2) सचिव- अतिरिक्त सचिव- अवर सचिव- सह सचिव-उपसचिव-सहाय्यक सचिव
3) सचिव-सह सचिव-उपसचिव- अवर सचिव - कक्ष अधिकारी
4) सचिव - सहसचिव - अतिरिक्त सचिव - अवर सचिव - सहाय्यक सचिव -उपसचिव

---

62. कॅबीनेट सचिवालयाची खालीलपैकी कोणते/ती कार्य/र्ये आहे/त ?
अ. कॅबीनेटच्या बैठकीची विषय पत्रिका तयार करणे.
ब. कॅबीनेट समित्यांना सचिवालयात्मक सहाय्य पुरविणे.
क. मंत्र्यांना आर्थिक साधनांचे वाटप करणे
खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.
1) फक्त अ　　2) ब आणि क　　3) अ आणि ब　　4) अ, ब आणि क

---

63. खालील विधाने विचारात घ्या.
अ. 95 व्या घटनादुरूस्ती अधिनियम - 2009 अन्वये लोकसभा आणि राज्याच्या विधानसभेतील अनुसूचीत जाती आणि जमातींसाठी राखीव जागांची मुदत 2020 पर्यंत वाढविण्यात आली आहे.
ब. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद -334 यात स्थानिक संस्थांमध्ये महिलांसाठी राखीव जागेची तरतूद नाही आणि म्हणून महिलांसाठी राखीव जागा या विशिष्ट मुदतीसाठी मर्यादित नाहीत.
1) विधान अ बरोबर　　2) विधान ब बरोबर　　3) दोन्हीही विधाने बरोबर　　4) दोन्हीही विधाने चूक

---

64. खालीलपैकी कोणते केन्द्रीय कार्यकारी विभागाचे अंग आहेत ?
अ. राष्ट्रपती　　ब. मंत्रिमंडळ　　क. महान्यायवादी　　ड. भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक
1) अ, ब, ड　　2) ब, क, ड　　3) अ, ब, क　　4) अ, क, ड

---

65. भारतीय राज्यघटनेतील सातव्या परिशिष्टातील राज्यसूचीमध्ये नमूद केलेला/ले कोणता/ते विषय राष्ट्रीय राजधानी दिल्ली शासनाच्या कार्यक्षेत्रातून

विशेषत्वाने वगळण्यात आला/ले ?

अ. सार्वजनिक सुरक्षा  ब. पोलिस  क. जमीन  ड. कर

1) फक्त ब  2) अ, ब  3) अ, ब, क  4) अ, ब, क व ड

---

66. राज्याच्या महाधिवक्त्यासंबंधी खालील विधाने विचारात घ्या.

अ. उच्च न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून नियुक्त होण्यासाठी जी अर्हता असते ती त्याच्याजवळ असणे आवश्यक असते.

ब. उच्च न्यायालयाच्या न्यायधीशास असणारे सर्व विशेषाधिकार फायदे व संरक्षण त्याला असते.

क. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशास जे मानधन असते ते त्यास मिळते.

ड. राज्य मंत्रिमंडळाची मर्जी असेपर्यंत तो आपल्या पदावर राहतो.

वरीलपैकी कोणते विधान/ने बरोबर आहे/त ?

1) अ, ब, ड  2) अ,ब,क  3) फक्त ड  4) फक्त अ

---

67. भारतीय संविधानाच्या कोणत्या तरतूदीनुसार मंत्र्यांची संख्या मर्यादित होते ?

1) 73 वी संविधान दुरूस्ती  2) 86 वी संविधान दुरूस्ती  3) 87 वी संविधान दुरूस्ती  4) 91 वी संविधान दुरूस्ती

---

68. भारतातील राष्ट्रपती पदाच्या निवडणूकीकरीता उमेदवाराचे नामांकन ------- कडून सूचित केले जाते.

1) कमीत कमी भारताचे पाच नागरिक  2) कमीत कमी संसदेचे पाच सदस्य

3) कमीत कमी निर्वाचक मंडळाचे पन्नास सदस्य  4) कमीत कमी निर्वाचक मंडळाचे दहा सदस्य

---

69. भारतातील संविधानाचे कलम 75 चे खालील कोणत्या तरतूदी आहेत ?

अ. राष्ट्रपती पंतप्रधानाच्या सल्ल्यावरून मंत्र्यांची नियुक्ती करेल.

ब. मंत्रिपरिषद लोकसभेस सामूहिकरित्या जबाबदार असेल.

क. राष्ट्रपतीला सल्ला व मदत देण्यासाठी पंतप्रधानाच्या नेतृत्वात मंत्रिपरिषद असेल

ड. मंत्र्यांचे वेतन व भत्ते संसदेकडून ठरविले जातील

खालील दिलेल्या संकेतातून योग्य उत्तर निवडा.

1) अ, ब आणि क केवळ  2) अ, ब आणि ड केवळ  3) ब, क आणि ड केवळ  4) वरील सर्व

---

70. भारताचे सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या वाढविण्याचा अधिकार कोणाला आहे ?

1) पंतप्रधान  2) भारताचे मुख्य न्यायाधीश  3) संसद  4) विधी मंत्री

---

71. खालीलपैकी कोणत्या मान्यवरांस पदग्रहण करण्यापूर्वी भारतीय राज्यघटनेचे रक्षण करण्याची शपथ घ्यावी लागते ?

अ. राष्ट्रपती  ब. उपराष्ट्रपती  क. पंतप्रधान  ड. लोकसभा सभापती

1) फक्त अ  2) अ आणि ब  3) अ, ब आणि क  4) अ, ब, क आणि ड

---

72. खालील विधाने विचारात घ्या :

अ. भारतीय राज्यघटनेचे अनुच्छेद-332 मध्ये राज्याच्या विधानसभेतील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी राखीव जागांची तरतूद करण्यात आली आहे.

ब. सध्या महाराष्ट्रात 29 विधानसभा मतदारसंघ हे अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव आहेत.

क. सध्या महाराष्ट्रात 25 विधानसभा मतदारसंघ हे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखीव आहेत.

वरीलपैकी कोणते विधान/ने बरोबर आहे ?

1) फक्त अ  2) अ, ब  3) ब, क  4) अ, ब, क

---

73. 'शून्य प्रहर' बाबत खालील विधाने विचारात घ्या :

अ. प्रश्नोत्तराच्या तासानंतर तो असतो.
ब. त्याचा उल्लेख कामकाज पध्दतीच्या नियमांमध्ये आहे.
क. संसदीय कार्यप्रणालीतील भारतातील हा एक नाविण्यपूर्ण उपक्रम आहे.
ड. कोणतीही पूर्वसूचना न देता लोकहिताचा कोणताही मुद्दा शून्य प्रहरात उपस्थित करण्यास सदस्य स्वतंत्र असतात.
वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?
1) अ, ब, क  2) अ, क,ड  3) ब, क, ड  4) अ, ब, ड

---

74. राज्याच्या राज्यपालांच्या विधिविषयक अधिकारांबाबत खालील विधाने विचारात घ्या :
अ. ते राज्य विधिमंडळाचे अधिवेशन बोलवू शकतात अथवा संपुष्टात आणू शकतात आणि राज्य विधानसभा बरखास्त करू शकतात.
ब. ते राज्य विधिमंडळाच्या बैठका स्थगित करू शकतात.
क. ते प्रलंबित असलेल्या विधेयकाबाबत राज्य विधिमंडळास संदेश पाठवू शकतात.
ड. जर विधेयक मार्गदर्शक तत्वाविरूध्द असेल तर ते राष्ट्रपतींच्या विचारार्थ विधेयक राखून ठेवू शकतात.
वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?
1) अ, क, ड  2) अ, ब, क  3) ब, क, ड  4) अ, ब, ड

---

75. महाराष्ट्रातील विधिमंडळ समिती पध्दतीबाबत खालीलपैकी कोणते विधान अयोग्य आहे ?
1) मंत्री समितीचा सदस्य असू शकत नाही
2) जर उपसभापती हा समितीचा सदस्य असेल तर त्याची नेमणूक त्या समितीचा अध्यक्ष म्हणून केली पाहिजे.
3) समितीचा सदस्य हा पुनर्नामांकनासाठी पात्र असतो.
4) समितीची गणसंख्या शक्यतो समितीच्या एकूण सभासद संख्येच्या एक तृतीयांशच्या जवळपास असावी लागते.

---

76. खालील विधाने विचारात घ्या :
अ. भारतीय संघराज्य हे राज्यांमधील कराराचा परिणाम आहे.
ब. 'नाशवंत घटकांचा अविनाशी संघ' असे भारतीय संघराज्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने निरीक्षण नोंदवले आहे.
क. 'अविनाशी राज्यांनी बनलेला एक अविनाशी संघ' असे अमेरिकन संघराज्याबाबत त्यांच्या सर्वोच्च न्यायालयाने वर्णन केले आहे.
वरीलपैकी कोणते विधान/विधाने बरोबर आहे/आहेत ?
1) अ, ब  2) फक्त ब  3) ब आणि क  4) फक्त क

YASH ACADEMY TM

---

77. विधान अ : भारत सरकार कायदा, 1935 अनुसार शेषाधिकार केन्द्रीय विधिमंडळाकडे दिलेले होते.
कारण ब : भारत सरकार कायदा, 1935 अनुसार संघराज्यीय, प्रांतिक आणि समवर्ती अशा तीन सूच्यांमध्ये विषयांची विभागणी केली गेली होती.
1) अ आणि ब दोन्हीही बरोबर असून ब हे अ चे योग्य स्पष्टीकरण आहे.
2) अ आणि ब दोन्हीही बरोबर आहेत परंतु ब हे अ चे योग्य स्पष्टीकरण नाही
3) अ बरोबर आहे तर ब चूक आहे
4) अ चूक आहे तर ब बरोबर आहे.

---

## जिल्हा प्रशासन, ग्रामीण आणि नागरी स्थानिक शासन

78. खालील विधाने विचारात घ्या
अ. स्वातंत्र्यप्राप्तिनंतरचे मुंबईचे पहिले शेरिफ हे शांताराम महादेव डहाणूकर होते
ब. शेरिफ हा उच्च न्यायालयाचा अधिकारी असतो.
क. मुंबई शेरिफचा कार्यकाळ पाच वर्षे आहे
ड. शेरीफचा मान महापौरांच्या खालोखाल असतो
वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहे/त ?

1) अ आणि ब 2) ब आणि क 3) ब आणि ड 4) क आणि ड

79. खालील विधाने विचारात घ्याः
अ. राष्ट्रपतीला, संघराज्याच्या कार्यकारी अधिकाराच्या व्याप्तीत येईल अशा कोणत्याही बाबी संबंधीची कार्ये राज्य शासनाच्या संमतीशिवाय त्या शासनाकडे किंवा त्याच्या अधिकाऱ्यांकडे सशर्त अथवा बिनशर्त सोपवता येतील.
ब. एखाद्या राज्याच्या राज्यपालाला राज्याच्या कार्यकारी अधिकाराच्या व्याप्तीत येत असेल अशा कोणत्याही बाबी संबंधीची कार्ये, भारत सरकारच्या संमतीने, त्या सरकारकडे किंवा त्याच्या अधिकाऱ्यांकडे सशर्त अथवा बिनशर्त सोपवता येतील.
1) विधान अ बरोबर 2) विधान ब बरोबर 3) दोन्हीही विधाने बरोबर 4) दोन्हीही विधाने चुक

80. खालीलपैकी कोणते विधान चूकीचे आहे ?
1) 38 वी घटना दुरूस्ती अधिनियम, 1975 नुसार अनुच्छेद 356 लागू करण्यासाठी राष्ट्रपतीचे समाधान अंतिम व निर्णायक असेल आणि त्याबाबत कोणत्याही न्यायालयात कोणत्याही कारणासाठी आवाहन देता येणार नाही.
2) 44 वी घटना दुरूस्ती अधिनियम, 1978 नुसार राष्ट्रपतीचे समाधान हे न्यायिक पुनर्विलोकनाच्या कक्षेबाहेर नाही, असे सूचित केले आहे.
3) धर्मनिरपेक्षता हे राज्यघटनेचे मूलभूत वैशिष्ट्यांपैकी एक आहे म्हणून धर्मनिरपेक्षतेविरूध्द धोरणे राबविणाऱ्या राज्य सरकारविरूध्द अनुच्छेद 356 अन्वये कारवाई करता येते.
4) वरीलपैकी एकही नाही

81. खालीलपैकी कोणत्या समितीने द्विस्तरीय पंचायती राज व्यवस्था सुचवली ?
1) बलवंतराय मेहता समिती 2) अशोक मेहता समिती 3) वसंतराव नाईक समिती 4) डॉ.एल. एम. संघवी समिती

82. पंचायत समितीला आसाममध्ये ''------'' म्हटले जाते.
1) आंचलिक पंचायत 2) जनपद सभा 3) महकमा परिषद 4) जिला पंचायत

83. बृहन मुंबई महानगरपालिका ही मुंबई महानगरपालिका कायदा ------- प्रमाणे चालवली जाते.
1) 1988 2) 2001 3) 1888 4) 1788

84. महानगरपालिकेचे खालील कार्ये विचारात घ्या आणि त्यापैकी कोणती कार्ये अनिवार्य आहे ते ओळखा ?
अ. जन्म-मृत्यूची नोंद करणे ब. पर्यावरण संरक्षण करणे क. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाची तरतूद करणे
ड. पूल व सार्वजनिक रस्त्यांची बांधणी व देखभाल करणे
वरीलपैकी योग्य पर्याय निवडा
1) अ आणि ब 2) अ, ब आणि ड 3) अ आणि ड 4) वरील सर्व

85. महाराष्ट्रातील छावणी मंडळे (कटक मंडळे) आहेत
अ. कामठी ब. बडनेरा क. देवळाली ड. खडकी
1) फक्त अ, ब, क 2) फक्त ब, क, ड 3) फक्त अ, क, ड 4) फक्त अ, ब, ड

86. नगरपालिकांनी काळजी घेतली पाहिजे अशा समाजातील -------- प्रकारच्या दुर्बल घटकांचा विशेष उल्लेख भारतीय राज्यघटनेच्या बाराव्या अनुसूचीमध्ये करण्यात आला आहे.
1) दोन 2)तीन 3) सहा 4) सात

87. नगरपालिकेशी संबंधित तरतूदींचा समावेश भारतीय राज्यघटनेच्या कोणत्या घटनादुरूस्ती कायद्यात करण्यात आली आहे ?
1) 72 वी घटनादुरूस्ती 2) 73 वी घटनादुरूस्ती 3) 74 वी घटनादुरूस्ती 4) 76 वी घटनादुरूस्ती

88. भारतात स्थापना झालेली पहिली नगर परिषद कोणती होती ?
1) बॉम्बे 2) कलकत्ता 3) मद्रास 4) दिल्ली

89. महाराष्ट्र महानगरपालिका कायद्याप्रमाणे महानगरपालिकेमधील स्थायी समितीमध्ये --------- सदस्य असले पाहिजेत.
1) 10 2) 12 3) 16 4) 15

90. 73 च्या घटनादुरूस्ती कायद्यानुसार पंचायत राज संस्थेच्या निवडणूका लढविण्यासाठी कमीत कमी किती वयोमर्यादा असणे आवश्यक आहे?
1) 18 वर्ष 2) 25 वर्ष 3) 21 वर्ष 4) 30 वर्ष

91. 74 च्या घटना दुरूस्ती कायद्याद्वारे भारतीय संविधानामध्ये कोणत्या अनुसूचीचा समावेश करण्यात आला ?
1) 9 वी अनुसूची 2) 10 वी अनुसूची 3) 11 वी अनुसूची 4) 12 वी अनुसूची

92. भारतीय राज्यघटनेच्या बाराव्या अनुसूचीमध्ये नगरपालिकांच्या किती कार्यांची/जबाबदाऱ्यांची यादी देण्यात आली आहे ?
1) 29 2) 18 3) 25 4) 22

93. जोडया लावा - (भारतातील सामुदायीक विकास)

| अ | ब |
|---|---|
| अ. श्रीनिकेतन प्रकल्प | 1. मुंबई सरकार |
| ब. बडोदा योजना | 2. महात्मा गांधी |
| क. सेवाग्राम प्रकल्प | 3. व्ही.टी. कृष्णमाचारी |
| ड. सर्वोदय योजना | 4. रविंद्रनाथ टागोर |

पर्याय

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 4 | 3 | 2 | 1 |
| 2) | 4 | 3 | 1 | 2 |
| 3) | 3 | 4 | 1 | 2 |
| 4) | 3 | 1 | 2 | 4 |

94. योग्य कथन/कथने ओळखा.
अ. मिझोरम, मेघालय व नागालँड या राज्यांना 73 वी घटना दुरूस्ती लागू होत नाही.
ब. 73 वी घटना दुरूस्तीची अंमलबजावणी करणारे प्रथम राज्य मध्य प्रदेश आहे.
1) फक्त अ 2) फक्त ब 3) अ आणि ब दोन्ही 4) अ आणि ब दोन्हीही नाही

95. 73 च्या घटना दुरूस्ती बाबत अयोग्य कथने ओळखा.
अ. या दुरूस्तीद्वारे पंचायत राज ला संवैधानिक दर्जा देण्यात आला.
ब. या दुरूस्तीद्वारे पंचायत राज साठी राज्य वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली.
क. या घटना दुरूस्तीने काही राज्यांना किंवा विशिष्ट प्रदेशांना सुट दिली आहे.
ड. या दुरूस्तीची अंमलबजावणी करणारे प्रथम राज्य हे राजस्थान ठरले.
1) फक्त अ, ब 2) फक्त ब, क 3) फक्त क, ड 4) फक्त अ, क

## न्यायमंडळ

96. खालीलपैकी सर्वोच्च न्यायालयाच्या कोणत्या निवाड्यानुसार सर्वोच्च व उच्च न्यायालयातील न्यायमूर्तींच्या नियुक्तीसाठी न्यायिक मंडळाची सुरूवात झाली ?
1) केशवानंद भारती निवाडा 1973 2) एस. पी. गुप्ता निवाडा 1982
3) सुप्रीम कोर्ट ॲडव्होकेट्स ऑन रेकॉर्ड असो. निवाडा 1993 4) रामास्वामी निवाडा 1992

97. खालीलपैकी कोणत्या बाबींच्या आधारावर उत्प्रेषण रिट याचिका आदेशीत करता येत नाही ?

1) जेथे अधिकारक्षेत्र वापरण्यात चुक/गफलत झाली असेल
2) जेथे कायद्याची चुक/ गल्लत झाली असेल
3) जेथे प्रथमदर्शनी तथ्यांची चुक/गल्लत झाली असेल
4) जेथे नैसर्गिक न्यायतत्वांचा भंग झाला असेल

---

98. उच्च न्यायालयाच्या न्यायीक व अधिकाराच्या अनुषंगाने जोडया लावा.

| अनुच्छेद | तरतूद |
|---|---|
| अ. 215 | 1. अधिकार कक्षेतील दुय्यम कोर्टातील दावा स्वतःकडे वर्ग करून घेणे |
| ब. 227 | 2. पर्यवेक्षन अधिकारीता |
| क. 228 | 3. न्यायालयीन बेअदबी बद्दल शास्ती अधिकारीता |
| ड. 235 | 4. दुय्यम न्यायालयांवर अंकुश अधिकारीता |

पर्याय :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 1 | 2 | 3 | 4 |
| 2) | 2 | 3 | 4 | 1 |
| 3) | 1 | 2 | 4 | 3 |
| 4) | 3 | 2 | 1 | 4 |

---

99. खालीलपैकी कोणत्या तरतुदीनुसार सर्वोच्च न्यायालयातील एकूण न्यायमूर्तींची संख्या वेळोवेळी निर्धरित केली जाते ?
1) भारतीय राज्य घटना अनुच्छेद 124 (2)
2) भारतीय दंड संहिता, 1860
3) सर्वोच्च न्यायालय (न्यायमूर्तींचीं संख्या) अधिनियम, 1956
4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

100. खालील विधानांचे अवलोकन करा.
अ. सक्रीय व कार्यक्षमपणे न्यायदान करणे हे न्यायालयीन सक्रीयतेचे मूलतत्व आहे.
ब. ''अधिकृत याचिकाकर्ता'' या नियमाचे उदारीकरण केल्यामुळे सार्वजनिक हितसंबंध याचिका या प्रकारचा उदय झाला.
वरील विधानांच्याअनुषंगाने खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.
1) विधान 'अ' बरोबर असून विधान 'ब' चुक आहे
2) दोन्ही विधाने बरोबर आहेत परंतु त्यांच्यामध्ये कोणताही सहसंबंध नाही.
3) दोन्ही विधाने बरोबर असून ते परस्परांशी सुसंगत आहेत
4) विधान 'ब' चुक परंतु ते विधान 'अ' ला पुरक आहे.

---

## ANS KEY - सहायक (मुख्य) परिक्षा - 2017

| Que. | Ans | Que. | Ans | Que. | Ans | Que. | Ans | Que. | Ans |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 21 | 4 | 41 | 4 | 61 | 3 | 81 | 2 |
| 2. | 4 | 22 | 2 | 42 | 2 | 62 | 3 | 82 | 1 |
| 3. | 4 | 23 | 4 | 43 | 2 | 63 | 3 | 83 | 3 |
| 4. | 3 | 24 | 3 | 44 | 4 | 64 | 3 | 84 | 2 |
| 5. | 4 | 25 | 3 | 45 | 3 | 65 | 3 | 85 | 3 |
| 6 | 4 | 26 | 2 | 46 | 4 | 66 | 4 | 86 | 1 |
| 7 | 3 | 27 | 3 | 47 | 3 | 67 | 4 | 87 | 3 |
| 8 | 2 | 28 | 3 | 48 | 3 | 68 | 3 | 88 | 3 |
| 9 | 4 | 29 | 3 | 49 | 3 | 69 | 2 | 89 | 3 |
| 10 | 2 | 30 | 4 | 50 | 2 | 70 | 3 | 90 | 3 |
| 11 | 3 | 31 | 3 | 51 | 3 | 71 | 1 | 91 | 4 |
| 12 | 3 | 32 | 1 | 52 | 2 | 72 | 4 | 92 | 2 |
| 13 | 4 | 33 | 3 | 53 | 1 | 73 | 2 | 93 | 1 |
| 14 | 4 | 34 | 2 | 54 | 2 | 74 | 1 | 94 | 3 |
| 15 | 3 | 35 | 4 | 55 | 3 | 75 | 4 | 95 | # |
| 16 | 4 | 36 | 4 | 56 | 4 | 76 | 3 | 96 | 3 |
| 17 | 2 | 37 | 4 | 57 | 3 | 77 | 4 | 97 | 3 |
| 18 | 2 | 38 | 2 | 58 | 4 | 78 | 3 | 98 | 4 |
| 19 | 1 | 39 | 1 | 59 | 3 | 79 | 2 | 99 | 3 |
| 20 | 2 | 40 | 1 | 60 | 1 | 80 | 4 | 100 | 3 |

THE YASH ACADEMY TM